| | |
|---|---|
| MHSN060020612012 | नियमित दरखास्त नं. २०९/२०१२<br>शशीकला पोतदार वि. पुरुषोत्तम पोतदार वगैरे १५ |

## निशाणी ३५ वरील आदेश

**०१.** प्रस्तुत अर्ज डी. एच. यांनी जेडी नं. ३/४ व १३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आणि जेडी नं. १०/१ यांचे नावापुढे मयत म्हणून नोंद करणेस परवानगीसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, रे. दि. मु. क्र. २३२/१९९५ चा दावा शेजजमीन व घर मिळकतीचे तुटक वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केला होता. त्यानुसार अंतिम हुकुमनामा नं. १/२००१ कामी झालेल्या अंतिम हुकुमनाम्याप्रमाणे दावा घर मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी मुळ वादी यांनी सदरचे काम दाखल केले आहे. सबब डीएच यांनी सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०२.** जेडीतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे दाखल केले नसलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात आला.

**०३.** डीएच यांचा अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. युक्तीवाद ऐकला.

**०४.** डीएच यांनी सदर अर्जाच्या सोबत स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. डीएच यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्राथमिक स्तरावर तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस जेडींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरचे अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल.

**०५.** अर्जाचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते, प्रकरणाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत डीएच यांचा अर्ज मंजूर करुन अर्जामध्ये

नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहेत. |
| २. | डीएच यांनी प्रस्तुत अर्जांमध्ये नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |

RANJANA VIJAY KAMBLE

Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2023.10.27 12:52:06 +0530

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –२६.१०.२०२३. दुसरे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

-

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 26.10.2023 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 26.10.2023 |
| Judgment/order uploaded on | :- | 27.10.2023 |